पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पदव्युत्तर संस्था, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय,

संत तुकारामनगर, पिंपरी- ४११०१८.

**जाहिरात क्रमांक १९५/२०२५**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पदव्युत्तर संस्था, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील अस्थायी आस्थापनेवर करार/एकत्रित ठोक मानधनावर हंगामी स्वरूपात ३ वर्षे कालावधीकरीता गट ‘अ’ व गट ‘ब’ मधील खालील पदे मुलाखतीद्वारे भरणेकामी अर्हताधारक उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहे. सदर विषयाची सविस्तर जाहिरात पिंपरी चिंचवड महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

वरील सर्व संवर्गातील प्रवर्गनिहाय रिक्त पदे, प्रत्येक संवर्गाकरीता सेवा प्रवेश नियमानुसार आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा तसेच अर्ज करण्याची अंतिम तारीख व नियुक्तीच्या अटी, शर्ती यांचे तपशील पिंपरी चिंचवड महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावरील मुखपृष्ठावर आमच्या बद्दल, नोकरी विषयी या मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

| अ.क्र | पदनाम | पदसंख्या | अ.क्र | पदनाम | पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | सहयोगी प्राध्यापक त्वचारोग | ०१ | ६ | सहाय्यक प्राध्यापक सर्वसाधारण शल्यचिकित्सा | ०५ |
| २ | सहयोगी प्राध्यापक मेडीसीन | ०३ | ७ | सहाय्यक प्राध्यापक बालरोगचिकित्सा | ०३ |
| ३ | सहयोगी प्राध्यापक सर्वसाधारण शल्यचिकीत्सा | ०१ | ८ | सहाय्यक प्राध्यापक स्त्री रोग व प्रसुतीशास्त्र | ०२ |
| ४ | सहाय्यक प्राध्यापक नेत्ररोग विभाग | ०१ | ९ | सहाय्यक प्राध्यापक अस्थीरोग शल्यचिकित्सा | ०४ |
| ५ | सहाय्यक प्राध्यापक रेडीओलॉजी | ०१ | १० | सहाय्यक प्राध्यापक मेडीसीन | ०६ |
| | | | ११ | सहाय्यक प्राध्यापक भुलशास्त्र | ०१ |
| | **एकुण रिक्त पदसंख्या** | | | | **२८** |

वरील सर्व संवर्गातील प्रवर्गनिहाय रिक्त पदे, प्रत्येक संवर्गाकरीता सेवा प्रवेश नियमानुसार आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा, नियुक्तीच्या अटी, शर्ती व अर्जाचा/आवेदन पत्राचा नमुना यांचा संपुर्ण तपशील पिंपरी चिंचवड महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावरील मुखपृष्टावर आमच्या बद्दल, नोकरी विषयी या मध्ये प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

उमेदवारांनी विहीत नमुन्यातील ऑनलाईन अर्ज भरण्यापुर्वी तसेच अधिक माहितीसाठी www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर जाऊन सविस्तर जाहिरात अभ्यासावी, भरावयाची सर्व माहिती आपलेकडे उपलब्ध आहे याची खात्री करावी व नंतरच उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरावा. ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रिंट काढून ठेवणे आवश्यक आहे. विहीत नमुन्यातील ऑनलाईन अर्जाशिवाय अन्य कोणत्याही प्रकारचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत तरी अधिक माहितीसाठी www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर भेट द्यावी. तरी इच्छुक पात्र उमेदवारांनी आपले आवेदन पत्रासह पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावरील जाहिरातीत नमुद केलेल्या मुलाखतीकरीता समक्ष उपस्थित रहावे.

Digital Signature
Signature valid
Name : SHEKHAR SINGH
Designation:Municipal Commissioner
Location:PCMC.
Date :02-09-2025 14:43

क्रमांकः वायसीएमएच/१३/कावि/१९०/२०२५

**दिनांक** – ०४.०९.२०२५

Scanned with OKEN Scanner

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-४११०१८**

**पदव्युत्तर संस्था, यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालय,**

**संत तुकारामनगर, पिंपरी – ४११०१८.**

दरमहा करार/एकत्रित ठोक मानधनावर हंगामी स्वरूपात ३ वर्षे कालावधीकरिता मुलाखती द्वारे तात्पुरत्या स्वरूपाची पदे भरणेबाबत

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पदव्युत्तर संस्था, यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयामध्ये दरमहा करार/एकत्रित ठोक मानधनावर खालील पदे हंगामी तात्पुरत्या स्वरूपात ३ वर्षे कालावधीकरीता मुलाखतीद्वारे भरावयाची आहेत. त्यांचे पदनाम, पदसंख्या, शैक्षणिक अर्हता, अटीशर्ती खालीलप्रमाणे

| अ.क्र. | पदनाम | रिक्त पद संख्या /आरक्षण | शैक्षणिक पात्रता | वयोमर्यादा (कमाल) |
|---|---|---|---|---|
| १. | सहयोगी प्राध्यापक सर्व साधारण शल्यचिकित्सा<br>र.रु.१,७०,०००/- | ०१ | १) परवानगी अधीन / मान्यताप्राप्त वैद्यकीय महाविद्यालय / संस्थेत चार वर्ष संबंधित विषयातील सहाय्यक प्राध्यापक.<br>२) किमान दोन संशोधन प्रकाशने असणे आवश्यक आहे [केवळ ओरिजिनल आर्टीकल, मेटाअन्यालीसीस, सिस्टिम्याटिक रीविव आणि केस सेरीस जे मेडलाइन, पबमेड, सेंट्रल सायन्स सायटेशन इंडेक्स, सायन्स सायटेशन इंडेक्स, एक्सपांडेड एम्बेसेज, स्कोपस, ओपन एक्सिस जर्नल्स(DOAJ) अनुक्रमित जर्नल्समध्ये प्रकाशित केले गेले, असे विचारात घेतले जातील].<br>३) एनएमसीने नियुक्त केलेल्या संस्थांमधून वैद्यकीय शिक्षण तंत्रज्ञानाचा मूलभूत अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा.<br>४) एनएमसीने नियुक्त केलेल्या संस्थांमधून बायोमेडिकल संशोधनाचा मूलभूत अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. | खुल्या प्रवर्गासाठी ४५ वर्षे<br>मागास प्रवर्गासाठी ५० वर्षे |
| २. | सहयोगी प्राध्यापक मेडीसीन<br>र.रु.१,७०.०००/- | एकुण पदे- ०३<br>अजा-०१<br>विजा-अ-०१<br>खुला-०१ | | |
| ३. | सहयोगी प्राध्यापक त्वचारोग<br>र.रु. १,७०,०००/- | ०१ | | |
| ४. | सहाय्यक प्राध्यापक सर्वसाधारण शल्यचिकीत्सा<br>र.रु. १,२५०००/- | एकुण पदे – ०५<br>अजा-०१<br>विजा अ-०१<br>इमाव-०१<br>साशैमाप्र-०१<br>खुला-०१ | MD/MS/DNB पदवी संपादन केल्यानंतर मान्यताप्राप्त/परवानगी मिळालेल्या वैद्यकीय महाविद्यालयात संबंधित विषयात वरिष्ठ निवासी म्हणून एक वर्ष. | खुल्या प्रवर्गासाठी ४० वर्षे<br>मागास प्रवर्गासाठी ४५ वर्षे |
| ५. | सहाय्यक प्राध्यापक मेडीसीन<br>र.रु.१,२५०००/- | एकुण पदे-०६<br>अजा-०१<br>विजा-अ-०१<br>इमाव-०१<br>साशैमाप्र-०१<br>खुला-०२ | | |
| ६. | सहाय्यक प्राध्यापक बालरोग चिकित्सा<br>र.रु.१,२५,०००/- | एकुण पदे- ०३<br>अजा-०१<br>विजा-अ-०१<br>खुला-०१ | | |
| ७ | सहाय्यक प्राध्यापक स्त्रीरोग व प्रसुती शास्त्र<br>र.रु.१,२५,०००/- | एकुण पदे-०२<br>अजा-०१<br>खुला-०१ | | |
| ८. | सहाय्यक प्राध्यापक नेत्ररोग विभाग<br>र.रु.१,२५,०००/- | ०१ | | |
| ९. | सहाय्यक प्राध्यापक अस्थीरोग शल्यचिकित्सा<br>र.रु.१,२५,०००/- | एकुण पदे-०४<br>अजा-०१<br>विजा-अ-०१<br>इमाव-०१<br>खुला-०१ | | |
| १०. | सहाय्यक प्राध्यापक रेडीओलॉजी<br>र.रु.१,२५,०००/- | ०१ | | |
| ११ | सहाय्यक प्राध्यापक भुलशास्त्र विभाग<br>र.रु.१,२५,०००/- | ०१ | | |
| | एकुण रिक्त पदे | २८ | | |

Scanned with OKEN Scanner

**टिप- १) अ. क्र.१,३,८,१० व ११ या एकाकी पदास आरक्षण लागू नाही.**

**२) आरक्षित रिक्त पदावर (उदा. ईडबल्युएस अथवा इतर) उपलब्ध नसल्यास सदर पदावर उपलब्ध असलेल्या पात्र उमेदवारांची आरक्षण नियमाप्रमाणे (क्रमाने आळीपाळीने) योग्यते नूसार नेमणूक करणेत येईल.**

**३) आरक्षित पदांकरीता उमेदवार उपलब्ध नसल्यास आरक्षित नियमाप्रमाणे (क्रमाने आळीपाळीने) सदर गटातील आरक्षित पदाकरीता उपलब्ध असलेल्या पात्र उमेदवारांची योग्यतेनूसार नेमणूक करणेत येईल.(अजा व अज आळीपाळीने, विजा(अ), भज(ब), इमाव, साशैमाप्र, भ.ज(क), आदुघ, भ.ज(ड)व विमाप्र या क्रमाणे आळीपाळीने)**

**<u>अटी व शर्ती –</u>**

१. नियुक्ती करणेत येणा-या उमेदवारांनी रूजू होताना ते इतर कोणत्याही पदव्युत्तर संस्थेत / शैक्षणिक संस्थेत नोंदणी / काम करत नसले बाबत हमीपत्र /कार्यमुक्त आदेश (रिलीव्हींग ऑर्डर ) करुन देणे बंधनकारक आहे.

२. राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग (NMC) निर्धारीत केलेली वैद्यकिय संस्थातील अध्यापकांसाठीची किमान अर्हता Teachers Eligibility Qualification in Medical Instituation Regulations 2022 and amendment 2023 नुसार उमेदवाराची पात्रता असावी.

३. सर्व नेमणुका ह्या ३ वर्षासाठी करार/एकत्रीत ठोक मानधनावर हंगामी स्वरूपाच्या आहेत, अर्जदारास कोणत्याही कायमपदी नेमणूकीचा हक्क राहणार नाही. तसेच सदरच्या पदावर ज्या दिनांकास स्थायी आस्थापनेवर (सरळ सेवेने) अध्यापक नियुक्त होईल त्या दिनांकास मानधनावरील अध्यापकांची सेवा संपुष्ठात येईल.

४. सर्व पदांना अदा करणेत येणारे वेतन हे ७ व्या वेतन आयोगानुसार महाराष्ट्र शासन निर्णय क्र. वेतनी-२०१९/प्र.क्र.०३/२०१९/वैसेवा-२, ता.३१ डिसेंबर, २०२०, अन्वये (ठोक मानधन) व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.-एसईसी-२०२१/प्र.क्र.१९९/२०१९/वैसेवा-३, दि.०९ फेब्रुवारी, २०२२ व सहाय्यक प्राध्यापक पदांना मा. स्थायी समिती ठराव क्र. ५७३८ दि. ०५.०८.२०२५ अन्वये करार पद्धतीने दरमहा मानधन अनुज्ञेय राहील.

५. महाराष्ट्र शासन निर्णय क्र. वेतनी-२०१९/प्र.क्र.०३/२०१९/वैसेवा-२, ता.३१ डिसेंबर, २०२०, अन्वये (ठोक मानधन) व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.-एसईसी-२०२१/प्र.क्र.१९९/२०१९/वैसेवा-३, दि.०९ फेब्रुवारी, २०२२ अन्वये करार पद्धतीने दरमहा मानधन अनुज्ञेय असल्याने अध्यापकांना व्यवसाय रोध भत्ता देय राहणार नाही.

६. आठवड्यातून फक्त एक दिवस साप्ताहिक सुट्टी राहिल. मानधन कलावधी दीड महिना काम केलेनंतर १ प्रमाणे एकुण ८ किरकोळ रजा एक वर्षासाठी देय राहतील. सार्वजनिक अथवा साप्ताहिक सुट्टीच्या ज्या दिवशी रुग्णालयाचे कामकाज बंद असते त्या दिवसाची सुट्टी उपभोगता येईल. तसेच सार्वजनिक सुट्टीचे दिवशी कामकाज करावे लागल्यास, केलेल्या कामकाजाबाबतचा कोणताही मोबदला / फायदे देय राहणार नाहीत.

७. उमेदवारांनी मुलाखतीसाठी उपस्थित राहताना शैक्षणीक अर्हता,जातीचे प्रमाणपत्र व जात वैद्यता प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र, पासपोर्ट साईज फोटो, महाराष्ट्र वैद्यक परिषद (MMC) अथवा केद्रीय वैद्यक परिषद (NMC) चे नोंदणी प्रमाणपत्र तसेच कागदपत्रांच्या मुळ प्रती व साक्षांकित केलेल्या प्रती उदा. प्रमाणपत्रे,फोटो इत्यादी सादर करणे बंधनकारक आहे.

८. मुलाखतीस येण्याजाण्याकरीता उमेदवारास कोणत्याही प्रकारचा भत्ता दिला जाणार नाही.

९. मानधनाचे पदावर कामकाज करताना आपणाकडुन सर्वांना नि:पक्षपातीने वागणूक मिळणे आवश्यक आहे.

१०. मानधनावरील नियुक्त केलेल्या पदाचे काम सोडताना किमान एक महिना अगोदर लेखी पुर्वसूचना कार्लयास देणे आपणावर बंधनकारक राहिल. अन्यथा आपणास १ महिन्याचे मानधन महापालिका कोषागारात जमा करवे लागेल, त्याशिवाय अनुभव प्रमाणपत्र मिळणार नाही.

११. सर्व पदांकरीता कामकाजाची वेळ ही पदव्युत्तर संस्थेतील अध्यापकांप्रमाणे असेल. तज्ञ अध्यापकांना दररोज राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग (NMC) नियमानुसार व रुग्णालयाच्या गरजे नुसार कामकाज करणे बंधनकारक राहील. तसेच रुग्णालयीन सेवेच्या आवश्यकतेनुसार तातडीक सेवा करावी लागेल.

१२. नेमणुक केलेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेशात महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या अटी व शर्तीनुसार कामकाज करणे बंधनकारक राहील.

१३. ज्या दिवशी मनपास नेमणूक केलेल्या उमेदवारांची आवश्यकता नसेल, त्यावेळी कोणतीही नोटीस न देता त्यांच्या सेवा संपुष्टात आणण्यात येतील.मानधनावरील नियुक्ती म्हणजे नोकरी नाही. त्यामुळे महापालिका अस्थापनेवर वेतनश्रेणीत नियुक्ती मिळावी म्हणुन निवेदन सादर करणार नाही किंवा तसा बाह्य दबाव आणणार नाही. कोणत्याही न्यायालयामध्ये दावा दाखल करणार नाही.

१४. सदर जाहिराती समवेत असलेल्या विहित नमुन्यामध्ये आवेदन पत्र सादर करणे बंधनकारक आहे.

१५. उमेदवारांची नेमणुक झालेनंतर बायोमेट्रीक (थंम्ब इंप्रेशन) पध्दतीने हजेरी नोंदविणे बंधनकारक राहील व त्याबरोबरच हजेरी पुस्तकावर दैनंदिनी (दररोज) स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. त्या शिवाय मानधन वेतन अदा केले जाणार नाही.

१६. वयोमर्यादेतील अट पुर्ण करणारे उमेदवार उपलब्ध नसल्यास वरील पदांबाबत वयाची अट शिथील करण्याचे अंतिम अधिकार मा. आयुक्त सो. यांना राहतील. शासकीय / निमशासकीय स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कार्यरत असणा-या अध्यापकांसाठी वयोमर्यादा शिथिलक्षम असेल.

१७. निवड झालेल्या उमेदवाराने आदेशाच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आत पदव्युत्तर संस्था, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये रुजू व्हावे. विहित मुदतीत रूजु न झालेस आपणांस महापालिका सेवेची आवश्यकता नाही असे समजन्यात येऊन तदनंतर सदर रिक्त पदावर अन्य उमेदवारांची / प्रतिक्षाधीन उमेदवारांची नेमणुक करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१८. पदव्युत्तर संस्था, य. च. स्मृती रूग्णालयातील मानधनावरील कार्यरत असलेल्या व ज्यांची चालू आदेश समाप्ती माहे ऑक्टोंबर २०२५ नंतर आहे अश्या अध्यापकांनी अर्ज करू नयेत ते स्विकारले जाणार नाहीत.

Scanned with OKEN Scanner

१९. दोन महिन्याच्या कालावधित रिक्त होणा-या पदांकरीता जाहिरात प्रकटन प्रसिध्द करणेत आले असुन सदर जागांकरीताची नियुक्ती ही प्रत्यक्ष जागा रिक्त झालेचे तारखेपासुन देय राहिल. यांची नोंद घ्यावी.

२०. सदर पदांची संख्या कमी जास्त अथवा रद्द करण्याचे अधिकार मा. आयुक्त सो. यांना राहतील.

तरी इच्छुक उमेदवारांनी वरील पदांकरिता दिनांक - ०९/०९ /२०२५ ते दिनांक-१५/०९/२०२५ अखेर मनपाचे www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरावा. पोस्टाने आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. मुदतीनंतर आलेल्या उमेदवारांच्या ऑनलाईन अर्जाचा विचार केला जाणार नाही. रजिस्ट्रेशन झालेल्या उमेदवारांना सदर पदासाठी घेतल्या जाणा-या मुलाखतीबाबत मनपाचे www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर सुचना दिल्या जातील व त्याबाबतचा तपशील वेबसाईटवर प्रसिध्द केला जाईल. सदर कालावधित आवश्यक तेवढे उमेदवार न मिळाल्यास वरील पदे भरणेबाबत दर सोमवारी Walk in Interview आयोजीत केले जातील. यासाठी समक्ष पत्रव्यवहार केला जाणार नाही.

Digital Signature
Signature valid
Name : SHEKHAR SINGH
Designation:Municipal Commissioner
Location:PCMC.
Date :02-09-2025 14:43

जाहीरात क्र.- १९५ /२०२५
रोटेशन क्र.-ब-
वेबसाईट –www.pcmcindia.gov.in
क्र.वायसीएमएच/१३/कावि/ १९१ /२०२५
दि. ०४ /०९/२०२५.

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner